# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर

## परीक्षा व मूल्यमापन मंडळ

परिपत्रक क्र :पवमूमाविगोक/२०२५-२६/१९१८

सर्व संलग्नित महाविद्यालयांचे प्राचार्य/परिसंस्थाचे संचालक यांना कळविण्यात येते की, **नोव्हेंबर/डिसेंबर-२०२५** मध्ये होणाऱ्या पदवी अभ्यासक्रमाच्या परीक्षा दिनांक १२.११.२०२५ पासून घेण्यात येणार आहेत. पदव्युत्तर परीक्षाच्या तारखा लवकरच जाहीर करण्यात येतील.

सर्व महाविद्यालयाना विद्यापीठाच्या **www.bamua.digitaluniversity.ac** या संकेतस्थळावर **(QPDS) Link** देण्यात आलेली आहे. तरी सर्व महाविद्यालयानी त्यांची पूर्ण माहिती **Online** पध्दतीने दिनांक. ०४.११.२०२५ पर्यंत भरावी सदर माहिती सर्व कला, विज्ञान, वाणिज्य, व्यावसाइक, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व इतर सर्व अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी **(QPDS) Link** मध्ये माहिती भरणे आवश्यक व अनिवार्य आहे. तसेच दिनांक ०५.११.२०२५ पासून डेमो (Mock Drill) घेण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

**(QPDS) लॉगीन बाबात महत्वाच्या सूचना :-**

०१. **Google Information Form (QPDS) Link :- परीक्षा केंद्राचे शिक्षक परीक्षा केंद्र प्रमुखांनीच (QPDS) Link मध्ये माहिती भरावी त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणाचीही माहिती सादर करु नये. ID व पासवर्ड फक्त प्राचार्य तथा परीक्षा केंद्र प्रमुख यांनाच देण्यात येईल इतर शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सदरची माहिती सादर करु नये तसे आढळल्यास गैरमार्गाचा अवलंब समजण्यात येईल.**

०२. **लॉगीन मध्ये फोटो अपलोड करत असताना प्राचार्य आणि ज्या शिक्षकांची केंद्रप्रमूखची जबाबदारी देण्यात आलेली आहे त्यांचा फोटो अपलोड करण्यात यावेत.**

०३. **Google Information Form (QPDS) Link लॉगीन मध्ये शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याची माहिती भरु नये. याची जबाबदारी संबंधीत परीक्षाकेंद्र प्रमूखांची राहील, याची नोंद घ्यावी.**

०४. महाविद्यालयास पाठविण्यात येणाऱ्या प्रश्नपत्रिका कक्षामध्ये फक्त केंद्रप्रमूखांनाच मोबाईल वापरण्यास परवानगी राहील परीक्षा कक्षामध्ये इतर कोणालाही मोबाईलचा वापर करता येणार नाही, काही गैरप्रकार झाल्यास त्यास प्राचार्य तथा परीक्षा केंद्र प्रमूख जबाबदार राहतील याची त्यांनी गांर्भीयाने नोंद घ्यावी.

०५. **तसेच परीक्षा सुरू झाल्यानंतर उपस्थिती/अनुपस्थिती त्याच दिवशी त्याच सत्रात लॉगीनमध्ये नमूद करण्यासाठी एक शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी, जेणे करुन निकाल लावण्यास सोयीस्कर होईल.**

तसेच वरील सूचनांप्रमाणे परीक्षेसाठी माहिती भरत असतांना प्राचार्य आणि केंद्र प्रमुखांनीच माहिती भरणे बंधनकारक राहील. महाविद्यालयाने सादर केलेल्या माहितीनुसार (QPDS) लॉगीन देण्यात येईल. लॉगीन दिल्यानंतर सदर बाब महाविद्यालयाचे प्राचार्य/परीक्षा केंद्रप्रमुख यांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही त्रयस्थ व्यक्तीस याची माहिती नसावी, या सबंधी गोपनियतेचे पालन करण्यात यावे. महाविद्यालयाकडून (QPDS) लॉगीन बाबत गैरवापर झाल्यास सबंधीत प्राचार्य/परीक्षा केंद्रप्रमुख जवाबदार असतील, व सदर परीक्षेच्या कामात काही गैरप्रकार आढळल्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

एखाद्या महाविद्यालयाने माहिती सादर न केल्यास, अशा महाविद्यालयांचे विद्यार्थी परीक्षेपासून वंचीत राहू शकतील, त्यामुळे सर्व महाविद्यालयांनी माहिती सादर करणे अनिवार्य व क्रमप्राप्त आहे, याऊपरही एखाद्या महाविद्यालयाने माहिती सादर न केल्यास विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्याची राहील. याची कृपया नोंद घ्यावी.

सदर माहिती ही अचूक भरणे बाबतची दक्षता/सर्व प्राचार्य/परीक्षा केंद्र प्रमुख यांनी घ्यावी व माहिती विहित मुदतीत भरुन विद्यापीठ प्रशासनास सहकार्य करावे.

संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

**विद्यापीठ प्रांगण,**
**छत्रपती संभाजीनगर**
संदर्भ क्र: परीक्षा व मूल्यमापन/गोपनीय/२०२५
दिनांक;-१०.१०.२०२५